# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.07.2024** **वारःबुधवार**

---

1. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर इथं मुख्यमंत्र्यांनी केली विठ्ठलाची महापूजा, शेतकरी सुखी-समाधानी राहू दे अशी प्रार्थना
2. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं येत्या रविवारी बोलावली सर्वपक्षीय बैठक
3. वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचं प्रशिक्षण स्थगित आणि
4. मुंबई- पुणे महामार्गावर झालेल्या अपघातात 5 जणांचा मृत्यू; मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रूपयांची मदत जाहीर

**विठ्ठल महापूजा**

आषाढी वारी निमित्त राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पंढरपूर येथील श्री विठ्ठलाची शासकीय महापूजा सपत्नीक पार पडली. राज्यात भरपूर पाऊस-पाणी पडू दे, माझा शेतकरी सुखी-समाधानी राहू दे अशी प्रार्थना मुख्यमंत्र्यांनी विठ्ठलचरणी केली. मानाचा वारकरी प्रतिनिधी म्हणून नाशिक जिल्ह्यातील बाळू अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशा यांना मान मिळाला. यावेळी अनेक मंत्री प्रशासनातले महत्त्वाचे अधिकारी मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. आषाढी यात्रेचा मुख्य सोहोळा आज मोठ्या उत्साहात पूर्ण होत आहे. या सोहोळ्यासाठी जवळपास 15 लाखांहून अधिक भाविक पंढरीत दाखल झाले आहेत.

**नमो एक्स्प्रेस-मुंबई**

आषाढी वारीसाठी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून भाजपाच्या वतीनं नमो एक्स्प्रेस ही गाडी भाविकांना घेऊन काल पंढरपूरला रवाना झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गाडीला झेंडा दाखवला.

**यात्रा बसस्थानक**

पंढरपूर इथं एसटी महामंडळाच्या जागेवर राज्यातलं पहिलं 34 फलाटांचं भव्य, चंद्रभागा यात्रा बसस्थानक आणि त्याला जोडूनच बांधण्यात आलेल्या यात्री निवासाचं लोकार्पण आज सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. आषाढी आणि कार्तिकी सारख्या मोठ्या यंत्रांना होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेत एसटी महामंडळानं हे स्थानक उभारलं आहे. अशा प्रकारचा हा एसटी महामंडळाचा पहिलाच प्रकल्प असून त्यासाठी 33 कोटी रुपये खर्च आला आहे.

**अधिवेशन**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या सोमवारपासून सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं येत्या रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरळीत पार पडावं यासाठी विरोधी पक्षांना सहकार्याचं आवाहन करण्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. 23 जुलै रोजी अर्थमंत्री संसदेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अधिवेशानाचं कामकाज 12 ऑगस्टपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे.

**खेडकर-वाशिम**

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचा प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित करण्याचा आदेश मसुरी इथल्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीनं जारी केला आहे. तसंच पुढील कार्यवाहीसाठी त्यांना 23 जुलैपूर्वी मसूरी इथं अकादमीत बोलवण्यात आलं आहे. अकादमीनं महाराष्ट्र शासनाला यासंदर्भात पत्र पाठवलं आहे, त्यानुसार राज्य शासनानं

खेडकर यांना जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रमातून मुक्त केलं असल्याची माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गद्रे यांनी काल दिली.

**<u>प्रकाश आंबेडकर-औरंगाबाद</u>**

ओबीसी आरक्षण तसंच अन्य मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडी येत्या 25 जुलैपासून आरक्षण बचाव यात्रा काढणार आहे. पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मुंबईत चैत्यभूमी इथून या यात्रेला सुरुवात होणार असून विदर्भ, मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यातून प्रवास करत 8 ऑगस्टला छत्रपती संभाजीनगर इथं यात्रेची सांगता होणार आहे. एसटी, एससी शिष्यवृत्तीमध्ये वाढ व्हावी, ओबीसी विद्यार्थ्यांना एसटी एससी शिष्यवृत्ती लागू करावी, तसंच जे कुणबी आहेत त्यांना आरक्षण मिळावं, या मागण्यांचा या यात्रेच्या माध्यमातून प्रचार करणार असल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं.

**<u>स्टील प्रकल्प उद्घाटन-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील वडलापेठ इथं, उभारल्या जाणाऱ्या पोलाद प्रकल्पाचं भूमिपूजन आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. हा प्रकल्प 350 एकर जागेवर उभारण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेनुसार आणि महाराष्ट्रात गुंतवणूक आणि औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी हा प्रकल्प उभारत आहोत अशी माहिती सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष सुनील जोशी यांनी काल प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

**<u>लाडकी बहीण रक्षाबंधन-कोल्हापूर</u>**

राज्यात नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांच्या सक्षमीकरणासाठी घोषित केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या महत्त्वकांक्षी योजनेतील पात्र बहिणांना येत्या राखी पौर्णिमेपूर्वी योजनेचा लाभ दिला जाणार असल्याची माहिती राज्याचे वैद्यकीय शिक्षण आणि विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी काल दिली. मुश्रीफ यांनी काल या योजनेसंदर्भात कोल्हापूर जिल्ह्याचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान राज्यात विविध जिल्ह्यात या योजनेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल होत असून कोल्हापूर जिल्ह्यात आतापर्यन्त 2 लाख 58 हजार अर्ज तर पुणे जिल्ह्यातून दोन लाखांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत.

मोहरम

मोहरम निमित्त आज पुणे शहराच्या विविध भागातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. शहरातील मध्यवर्ती भाग, लष्कर भाग, खडकी, पाटील इस्टेट आणि इमाम वाडा या भागातून मिरवणूक काढण्यात येईल. त्यामुळे या भागातील रस्ते आवश्यकतेनुसार बंद केले जातील अशी माहिती वाहतूक विभागाने दिली आहे.

**<u>साईबाबा मंदिर सुरक्षा-नगर</u>**

शिर्डी इथल्या साईबाबा मंदिराला सीआरपीएफ अर्थात केंद्रीय राखीव पोलीस दल किंवा सीआयएफएफ अर्थात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची सुरक्षा पुरवण्याबाबत शिफारस करण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राज्याचे निवृत्त मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष असतील. 30 नोव्हेंबर पर्यंत याबाबतचा गोपनीय अहवाल समितीला न्यायालयात दाखल करावा लागणार आहे.

**<u>नवी मुंबई हत्या</u>**

नवी मुंबईतील बेलापूरमधील अक्षता म्हात्रे हिच्या मृत्यूप्रकरणाचा वाशी ग्रामस्थांनी काल निषेध केला. या प्रकरणी पारदर्शक चौकशी करावी अशी मागणी भाजपाच्या प्रदेश महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष वर्षा भोसले यांनी केली आहे. अक्षता म्हात्रे हिला 6 जुलै रोजी गुंगीचं औषध देऊन तिच्यासोबत अतिप्रसंग करून तिची हत्या करण्यात आली; या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

**<u>अजित दिवाडकर निधन-नागपूर</u>**

नागपूरच्या दिवाडकर्स अजित बेकरीचे संचालक आणि ज्येष्ठ रंगकर्मी अजित दिवाडकर यांचं काल निधन झालं. ते 80 वर्षांचे होते. अनेक दर्जेदार नाटकांमध्ये त्यांनी भूमिका केल्या आणि पारितोषिकंही पटकावली. आकाशवाणी, श्रुतिकांमध्ये त्यांचा सहभाग होता.

**<u>भाविक अपघात-रायगड</u>**

मुंबई - पुणे महामार्गावर काल सकाळी झालेल्या भीषण अपघातात 5 जणांचा मृत्यू झाला तर 46 जण जखमी झाले आहेत. रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील भाविकांना पंढरपूरला घेऊन जाणाऱ्या बसची ट्रॅक्टरला जोरदार धडक बसल्याने हा अपघात झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत तर जखमींच्या उपचाराचा खर्च सरकारच्या वतीने करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी काल कळंबोली इथल्या रूग्णालयात जाऊन जखमींची चौकशी केली. जखमींपैकी सात जणांची प्रकृती गंभीर आहे.

**<u>कबड्डी-सीमा, नगर</u>**

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या मान्यतेने, पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात 71 व्या महिला आणि पुरुष राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेला सोमवारी सुरुवात झाली. स्पर्धेत पुरुष विभागात काल पुणे शहर संघासह रायगड, परभणी, अहमदनगर, मुंबई शहर पश्चिम, रत्नागिरी, नंदुरबार आणि ठाणे ग्रामीण या संघानी आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करत आगेकूच केली

दरम्यान, राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणूकीसाठी अंतिम यादीतील बदल अहवाल वेळेत न दिल्याचे कारण देत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदानासाठी पाठविण्यात आलेली नावे अवैध ठरविल्याच्या निर्णयाविरोधात खासदार नीलेश लंके आणि सच्चिदानंद भोसले यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून त्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर उद्या सुनावणी होणार आहे. येत्या 21 जुलै रोजी ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.